पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा. शहर सुधारणा समिति

**कार्यपत्रिका क्रमांक - १७**

सभावृत्तांत

**दिनांक - १५/०४/२०१५** **वेळ - दुपारी ३.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **१५/०४/२०१५** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) **मा. छाया जगन्नाथ साबळे - सभापती**
२) मा. नेटके सुमन राजेंद्र
३) मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
४) मा. लोखंडे गोरक्ष जाकाराम
५) मा. आसवाणी सविता धनराज

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक – मा.आशा सुर्यवंशी

मा.शहर सुधारणा समिती सभा बुधवार दि.०६/०५/२०१५ रोजी दुपारी २.४५ पर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**मा.सभापती -** बुधवार दि.०६/०५/२०१५ रोजी दुपारी २.४५ पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

( **छाया जगन्नाथ साबळे** )
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा. शहर सुधारणा समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – १७**

सभावृत्तांत

(दिनांक १५/०४/२०१५ ची तहकूब सभा)

**दिनांक - ०६/०५/२०१५** **वेळ - दुपारी २.४५ वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची दि. **१५/०४/२०१५** ची तहकूब सभा बुधवार दिनांक **०६/०५/२०१५** रोजी दुपारी **२.४५** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) **मा. छाया जगन्नाथ साबळे - सभापती**
२) मा. आर.एस.कुमार
३) मा. नेटके सुमन राजेंद्र
४) मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
५) मा. जवळकर वैशाली राहुल

या शिवाय मा.दंडवते – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.वाघ – उप अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

दिनांक ०१/०४/२०१५ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्र.१६)** चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – ४८ विषय क्रमांक – १

दिनांक – ०६/०५/२०१५ विभाग – नगररचना व विकास

सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक – मा.आशा सुर्यवंशी

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र. नरवि/कावि/१४/०८/२०१५,

दिनांक – १०/०३/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन -

मौजे औंध येथील राजीव गांधी उड्डाण पुला पासून ते मौजे ताथवडेपुनावळे हद्दीपर्यंत ४५.०० मी. रुंद रस्ता विकास योजनेमध्ये प्रस्तावित असून सध्या जागेवर ४५.०० मी. रुंद रस्ता विकसित झालेला आहे. वाहतूक व दळणवळणाच्या नियोजनाकरीता ताथवडे – पुनावळे हद्दीपासून रावेत ते मुकाई चौक किवळे मुंबई – पुणे हायवे पर्यंत ४५.०० मी. रुंद रस्ता प्रस्तावित करणेबाबत स्थापत्य विभागाने मागणी केलेली आहे. या प्रस्तावाचे अनुषंगाने मंजूर विकास योजनेतील प्रस्तावित रस्ता रुंदी खालीलप्रमाणे आहे. १) ताथवडे पुनावळे हद्दीपासून पुनावळे रावेत पुलापर्यंत रस्ता रुंदी - ३०.०० मी. २) रावेत हद्दीपासून ते किवळे हद्दीपर्यंत रस्तारुंदी ३०.०० मी. व ३४.५० मी. ३) किवळे हद्दीपासून ते मुंबई पुणे हायवे पर्यंत रस्तारुंदी - ३०.०० मी. रावेत पुलापासून ते रावेत गावठाण हद्दीपर्यंत रस्तारुंदी पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या मंजूर विकास योजनेनुसार ३४.५० मी. रस्तारुंदी प्रस्तावित केलेली आहे. स्थापत्य विभागाने केलेल्या मागणीनुसार वाहतुकीच्या दृष्टीकोनातून उक्त रस्त्याची रुंदी ४५.०० मी. करणे. भविष्यात होणा-या वाहतूकीच्या दृष्टीकोनातून आवश्यक आहे. मंजूर विकास योजनेतील रस्तारुंदी वर उल्लेख केल्यानुसार ४५.०० मी. रुंद करण्याकरिता म.प्रा.व न.र.अधिनियम १९६६ च्या कलम ३७ अन्वये फेरबदल प्रस्ताव सुरु करण्यास आणि सदर फेरबदल प्रस्तावावर प्राप्त हरकतधारकांना सुनावणी देऊन व त्यावर निर्णय घेऊन शासनास अहवाल सादर करण्यास मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करणेस मान्यता देणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी सांगवी किवळे या बी.आर.टी. मार्गाचे महानगरपालिकेच्या विकास आराखडयामध्ये सलग ४५.०० मी. रुंदीच्या रस्त्याचे आरक्षण करणेबाबत सदर ठरावात अंतर्भूत आहे. सदर ठरावात नमुद स्थापत्य विभागाने मागणी केलेल्या सांगवी-किवळे या बी.आर.टी. मार्गापैकी प्रत्यक्ष मार्गाचा विचार करता सदरच्या रस्त्यापैकी ४५.०० मी. रुंद रस्त्याची मुकाई चौक, किवळे येथपर्यंतच आवश्यता दिसून येते कारण की, १) मुकाई चौकापासून पूर्व व पश्चिम दिशेस ४५.०० मी. रस्ते प्रस्तावित आहेत. २) मुकाई चौकात बी.आर.टी. स्टेशन प्रस्तावित आहे. ३) वाहतूकीचा विचार करता सदर रस्त्याची रुंदी प्रस्तावित करणेबाबत नमूद आहे. तथापि सदरची वाहतूक मुंबई पुणे हायवे ते मुकाई चौक या दरम्यान एकाच दिशेने जास्त होईल असे दिसून येते. ४) सदरील रस्त्याने बाधित होणा-या शेतक-यांचीच अन्य आरक्षणासाठीही जागा बाधीत होत आहे. सबब सदर शेतक-यांवर अन्याय होत आहे. वरील कारणांचा विचार करता सांगवी-किवळे या बी.आर.टी. मार्गापैकी मुकाई चौक ते मुंबई-पुणे हायवे पर्यंतची प्रस्तावित रस्ता रुंदी ४५.०० मी. ऐवजी ३०.०० मी.

ठेवणेस मान्यता देणेकामी मा.महानगरपालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( छाया जगन्नाथ साबळे )**
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/३६५/२०१५
दिनांक : ०७/०५/२०१५



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

\\172.16.0.152\e\e drive\Nagersachiv1\Shahar Sudharana-14-15\proceeding 17_Shahar Sudharna.doc